जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2020
पुढारी

# विद्यापीठाचा बुधवारी वर्धापन दिन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा वर्धापन दिन दि. १८ रोजी साधेपणाने साजरा करण्यात येणार आहे. कोरोनामुळे यावर्षी होणारे इतर सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. वर्धापन दिनानिमित्त १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता विद्यापीठ प्रांगणात कुलगुरू, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण समारंभ होणार आहे. विद्यापीठ अंतिम वर्ष परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यावर शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेल्या पाल्यांना व विद्यापीठ प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधीमधून सदस्यांच्या पाल्यांना प्रमाणपत्र व बक्षीस पाठविण्यात येणार आहेत. वर्धापन दिनादिवशी कार्यालयीन व पदव्युत्तर विभागाची कामकाज वेळ सकाळी ८.०० ते ११.३० अशी असणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

16 NOV 2020

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तब्बल दोन हजार विद्यार्थी गैरहजर



- पुन्हा अंतिम परीक्षा घेण्याचे नियोजन सुरु
- लवकरच होणार परीक्षा
- २० नोव्हेंबरला ॲकॅडमीक कौन्सिलची बैठक

| ऑनलाईन परीक्षेस हजर विद्यार्थी | |
|---|---|
| नोंदणीकृत | ४८,९५६ |
| प्रत्यक्ष हजर | ४७,९७८ |
| गैरहजर | ९७८ |

| ऑफलाईन परीक्षेस हजर विद्यार्थी | |
|---|---|
| नोंदणीकृत | २४००९ |
| प्रत्यक्ष हजर | २३२८९ |
| गैरहजर | ७२० |

आशिष आडिवरेकर
कोल्हापूर

तांत्रिक कारणास्तव तीन वेळा पुढे ढकलण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षातील शेवटच्या सत्राच्या परीक्षा मंगळवार (१० नोव्हेंबर) रोजी सुरळीत पार पडल्या. या परीक्षेला सुमारे २ हजार विद्यार्थी गैरहजर राहिले आहेत. ऑनलाईन परीक्षेसाठी ९७८ तर ऑफलाईनसाठी ७२० विद्यार्थी गैरहजर राहिले आहेत. त्यांची पुन्हा परीक्षा घेण्याचे नियोजन परीक्षा विभागाने सुरु केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे नियोजन राज्य सरकार व विद्यापीठ प्रशासनाने सुरु केले आहे. ३१ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा घेऊन १० नोव्हेंबरपूर्वी निकाल लावण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत. यानुसार परीक्षा घेण्याचे नियोजन शिवाजी विद्यापीठाने केले होते. मात्र विविध कारणांमुळे तीन वेळा परीक्षांच्या तारखा पुढे ढकलल्या होत्या. २७ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावाधीमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा पार पडल्या. एकूण ७१ हजार ७६२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून यापैकी ४८ हजार ९५६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर २४ हजार ९ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षेचा पर्याय निवडला होता. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील २९३ परीक्षा केंद्रावर १५५ अभ्यासक्रमांसाठी परीक्षा पार पडली. एकाच दिवशी तीन सत्रात परीक्षा घेऊन विद्यापीठाने परीक्षा वेळेत पूर्ण केल्या. मात्र परीक्षेस सुमारे दोन हजार विद्यार्थी गैरहजर राहिले आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गैरहजर विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घेतली जाणार असल्याचे जाहीर केले होते. यानुसार गैरहजर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठाने द्विसदस्यीय समिती नेमली. या समितीने पाच दिवसांमध्ये गैरहजर विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय आकडेवारी तयार केली आहे. या विद्यार्थ्यांच्या परीक्षा कोण घेणार, कशा पद्धतीने घ्यायाच्या, परीक्षांचे वेळापत्रक याबाबत समितीने अहवाल तयार केला. हा अहवाल २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ॲकॅडमीक कौन्सिलच्या बैठकीत हा अहवाल सादर केला जाणार आहे.

### ॲकॅडमीक कौन्सिलच्या बैठकीत निर्णय शक्य

शिवाजी विद्यापीठाच्या ॲकॅडमीक कौन्सिलची बैठक २० रोजी होणार आहे. विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांमध्ये गैरहजर विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याबाबत या बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीमध्ये गैरहजर विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत निर्णय होणार आहे. या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. १७२ परीक्षांपैकी सुमारे १५० हून अधिक परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. उर्वरीत परीक्षांचे निकाल तयार करण्याचे काम सुरु आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षांना गैरहजर विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याचे नियोजन सुरु आहे. गैरहजर विद्यार्थ्यांबाबत महाविद्यालयांकडून अर्ज प्राप्त झाले आहेत. लवकरच या परीक्षा घेण्यात येतील.

– कुलगुरु डॉ. डि. टी. शिर्के

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2020
सकाळ

# प्रियांका गवळी कलर्सची मानकरी



प्रियांका गवळी

**कंदलगाव :** आर.के.नगर येथील कृष्णकल्प बॉक्सिंग आणि फिटनेस ॲकॅडमीची खेळाडू प्रियांका सुरेश गवळी हिला ऑल इंडिया इंटर इन्वरसिटी बॉक्सिंग चॅम्पेयनशिप वुमेन २०१८-१९ महिला बॉक्सिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला प्रथम पदक प्राप्त करून दिल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचा कलर्स पुरस्कार प्राप्त झाला. पी. टी. गायकवाड यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला. सरनाईक, धीरज पाटील, तळेकर यांची उपस्थिती होती. प्रियांकाला ऋतुराज कदम, रोहित कदम, पंकज कदम यांचे मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2020
सकाळ

# दूर शिक्षणचे प्रवेश ३० नोव्हेंबरपर्यंत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राच्या प्रवेशांना मुदतवाढ दिली आहे. हे प्रवेश ३० नोव्हेंबरपर्यंत होणार आहेत. त्यामुळे ज्यांना प्रवेश हवा आहे त्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून प्रवेश प्रक्रियेची माहिती घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासन आणि दूर शिक्षण केंद्र यांनी केले आहे. काही विद्यार्थ्यांना विविध कारणांनी आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागते. त्यांना पुन्हा शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळावी यासाठी दूर शिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली. यंदा कोरोनामुळे दूरशिक्षणचे सर्वच प्रवेश लांबणीवर पडले. मात्र, आता प्रवेश घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहेत. विशेष म्हणजे ज्यांचे ऑनलाईन प्रवेश होणार नाहीत त्यांच्यासाठी ऑफलाईन प्रवेश प्रक्रियाही राबवली जाणार आहे. प्रवेश प्रक्रियेची सर्व माहिती संकेतस्थळावर दिली आहे.

# डॉ. पाटील यांनी स्वीकारला प्र-कुलगुरू पदाचा कार्यभार

## अभिनंदनासाठी गर्दी टाळण्याचे प्र-कुलगुरूंचे आवाहन

प्रतिनिधी @ नवराष्ट्र

**कोल्हापूर**: शिवाजी विद्यापीठाचे सातवे प्र-कुलगुरू म्हणून प्रा. डॉ. पी.एस. पाटील यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार कुटुंबियांच्या साक्षीने स्वीकारला. सकाळी डॉ. पाटील यांनी प्रथेप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब, कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर डॉ. बापूजी साळुंखे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्प वाहून अभिवादन केले.



यावेळी त्यांच्यासमवेत पत्नी शिल्पा पाटील आणि मुलगे अखिलेश व आर्यन होते. त्यांच्यासह त्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेश केला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी डॉ. पाटील यांचे त्यांच्या दालनात स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी ग्रंथभेट देऊन स्वागत केले. डॉ. पाटील हे विद्यार्थीप्रिय शिक्षक असल्याने या प्रसंगी त्यांचे पदार्थविज्ञान व नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते. कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर, अभिनंदनासाठी शिक्षक, विद्यार्थी, मान्यवर, नागरिकांनी विद्यापीठ कार्यालयात गर्दी करु नये.

### माजी कुलगुरू डॉ. के.बी. पवार यांच्या आठवणींचा गहिवर

पपाटील हे शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के.बी. पवार यांचे जावई. विद्यापीठ प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील यांचा पुतळा हा डॉ. पवार यांच्या कारकीर्दीत सन १९८८ मध्ये उभारण्यात आला. कर्मवीरांच्या पुतळ्याला अभिवादन करताना डॉ. पवार यांच्या आठवणीने डॉ. पाटील गहिवरले.